## डॉ शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय व वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, वाडा.

### मराठी विभाग

### दिनांक १०-०८-२०२१ रोजी घेतलेल्या विभागातील बैठकीचे इतिवृत्त

दिनाक १०-०८-२०२१ रोजी मराठी विभागाची बैठक संपन्न झाली. सदर बैठकीस पुढील सभासद उपस्थित होते.

1. डॉ कैलास प्रभाक्रर जोशी ( विभागप्रमुख, सहयोगी प्राध्यापक)

2. डॉ. किरणकुमार सुबराव कवठेकर ( सहयोगी प्राध्यापक.)

सभेपुढील विषय.

1. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

2.शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ साठीच्या असलेल्या अभ्यासक्रमाचा आढावा घेणे. तसेच अभ्यासविषपत्रिकांच्या अध्यापन हेतूंचे आणि अपेक्षित परिणामांची चर्चा करणे.

3. शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ साठीच्या कार्यभार वाटपाचे नियोजन करणे.

4..शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मधील सत्र १ ते ६ मधील अध्यापन कामकाजाचे नियोजन करणे.

5. शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मधील मराठी विभागामार्फत घेतल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमपूरक व इतर कार्यक्रमांचे नियोजन करणे.

6. आयत्यावेळी उपस्थित होणारे विषय.

विषय १. मागील बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मागील बैठकीचे इतिवृत्त वाचले जाऊन ते कायम करण्यात आले.

विषय २.शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ साठीच्या असलेल्या अभ्यासक्रमाचा आढावा घेणे तसेच अभासविषयपत्रिकांच्या अध्यापन हेतूंचे आणि अपेक्षित परिणांमांची चर्चा करणे.

शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ साठी असलेल्या मराठी साहित्य या विषयांतर्गत असलेल्या अभ्यासपत्रिकांमधील अभ्यासक्रमाचे अवलोकन करण्यात आले. सदर अभ्यासक्रम शिकविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या तयारीचा प्राथमिक विचार करण्यात आला. अभ्यासक्रमाच्या तसेच अभासक्रमात अंतर्भूत असलेल्या विषपत्रिकांच्या अध्यापन हेतूंची चर्चा करण्यात आली. काही. अध्यापनहेतू अभ्यासमंडळाने नमूद केले आहेत, तर काही संभाव्य हेतूंची चर्चा करण्यात आली.

विषय ३. शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ साठीच्या कार्यभार वाटपाचे नियोजन करणे.

महाविद्यालयातील मराठी विषयास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या व संभाव्य तुकड्या लक्षात घेतल्या गेल्या. विद्यापीठाने व मराठी अभ्यास मंडळाने प्रत्येक विषपत्रिकेसाठी नियत केलेल्या कार्यभाराचा विचार करण्यात आला.

विभागातील शिक्षकांनी कोणकोणत्या विषयपत्रिका शिकवाव्यात हे ठरले. मराठी विभागास पायाभूत अभ्यासक्रम या विषयपत्रिकेचा काही कार्यभार सोपवला जातो हे लक्षात घेतले गेले. सदर कार्यभार मा. प्राचार्यांच्या मर्गदर्शनानंतर वेळापत्रक समितीस कळवावे असे ठरले.

विषय ४. शैक्षणिक वर्ष २०२१ - २२  मधील अध्यापन कामकाजाचे नियोजन करणे.

मा. प्राचार्य शैक्षणिक नियोजन समिती, आयक्यूएसी यांनी घेतलेल्या संयुक्त सभेत विद्यापीठाचे वार्षिक नियोजन मांडले गेले.या नियोजनाला अनुसरून मराठी विभागाच्या बैठकीत विद्यापीठाने शैक्षणिक कार्यक्रमातील अध्यापन, परीक्षा व मूल्यमापन याकरीता नियत केलेला कालावधी विचारात घेतला गेला. अध्यापनातील विषयओळख, प्रत्यक्ष अध्यापन, प्रकल्प नियोजन, सातत्यपूर्ण मूल्यमापन या टप्प्यांचा विचार केला गेला.सदर बाबींचा विचार करून सत्र १ ते ६ मधील अध्यापन कामकाजाचे नियोजन तयार करून ते नियोजन समितीस सादर करावे असे ठरेल. सदर नियोजनास आधार म्हणून विभागातील शिक्षकांनी त्यांना नेमून दिलेल्या विषयपत्रिकांच्या अध्यापन नियोजनाचा आराखडा विभागात सादर करावा असे ठरले.

विषय ५. शैक्षणिक वर्ष २०२१ – २२ मधील मराठी विभागामार्फत घेतल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमपूरक व इतर कार्यक्रमांचे नियोजन करणे.

शैक्षणिक वर्ष २०२१ - २२  मध्ये मराठी विभागाने कोणकोणत्या उपक्रमांचे आयोजन करावे यावर चर्चा करण्यात आली. या संदर्भात शासकीय व विद्यापीठाचे आदेश व माननीय प्राचार्य यांचे मार्गदर्शन घ्यावे असे ठरले. यातून निश्चित केलेल्या उपक्रमांचा नियोजन आराखडा करावा असे ठरले. सदर नियोजनाचा समावेष विभागाच्या एकूण नियोजन आराखडयात करण्यात यावा असे ठरले.

विषय ६ आयत्यावेळी उपस्थित होणारे विषय.

मराठी विभागाने नियोजित केलेले उपक्रम महाविद्यालयातील इतर विभागांच्या संयुक्त सहकार्याने करता येतील किंवा कसे हे तपासले गेले, त्यानुसार कार्यवाही करण्यास हरक्त नाही असे ठरेल. बैठकीत चर्चा केले गेलेले विषय व त्यावरील कार्यवाही कागदोपत्री नमूद करून योग्य त्या व्यक्ती व विभागांकडे सोपवावे असे ठरले. सदर साठी मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन घ्यावे असे ठरले.

सदर चर्चेनंतर बैठक संपली.

स्थळ व दिनांक   ११-०८-२०२१ .

विभाग प्रमुख
मराठी विभाग
शिक्षक संचालित शिक्षण संस्थेचे,क
विज्ञान महाविद्यालय,वाडा,जि.ठा